# मुलाखत

मानवी व्यक्तिमत्वाचे विविध कंगोरे जाणून घेण्यासाठी जाणीवपूर्वक , नियोजनबध्द केलेली विचारपूस म्हणजे मुलाखत होय .

# मुलाखतीचे हेतू :

१)मुलाखत देणाऱ्याच्या कार्यावर व आयुष्यावर प्रकाश टाकण्यासाठी

२) मुलाखत दात्याची विविध विषयावरची मते जाणून घेण्यासाठी .

३) मुलाखत दात्याच्या व्यक्तिमत्वातील विविध पैलू उलगडून दाखवण्यासाठी .

४) श्रोत्यांना मुलाखतीत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहभागी करून घेण्यासाठी .

# मुलाखतीचे प्रकार :

१) व्यक्तिगत मुलाखत – सामाजिक , सांस्कृतिक , राजकीय , उद्योग , व्यापार , कला इ. क्षेत्रातील एखाद्या थोर व्यक्तीच्या व्यक्तिमत्वातील विशेष गुण इतरांना प्रेरणादायी ठरावेत या हेतूने व्यक्तिगत मुलाखत घेतली जाते.

२) गटमुलाखत –विशेष व्यक्ती गट यांच्यासाठीच्या प्रश्नांवर ( समस्यांवर ) त्या त्या गटाशी संबंधित लोकांची मते जाणून घेण्यासाठी गट मुलाखत घेतली जाते. ( जेष्ठ नागरिक , महिला , तरुण , बालके , शेतकरी , कामगार इ. गट )

३) प्रकट मुलाखत – अचानक उद्भवलेल्या समस्या , झालेले बदल, निर्णय, येणारे चित्रपट किंवा नाटक यांबद्दल जाणून घेण्यासाठी- आयत्या वेळी विचारलेल्या कोणत्याही प्रश्नांवर उत्तरे मिळवण्यासाठी प्रकट मुलाखत घेतली जाते.

४) जन मुलाखत - जनजीवनाशी संबधित सर्वसामान्य जनतेचे प्रश्न , समस्या , मागण्या , मते, भावना, आशा अपेक्षा जाणून घेण्यासाठी जन मुलाखती घेतल्या जातात.

५) नोकरीसाठी मुलाखत – सरकारी अथवा खाजगी क्षेत्रातील आस्थापनेत नोकर भरती करतांना नोकरी साठी इच्छुक उमेदवाराची शैक्षणिक – सामाजिक पात्रता – गुणविशेष – व्यक्तिविशेष (मते – भावना - दृष्टीकोन – कल्पना ) जाणून घेण्यासाठी नोकरीसाठीची मुलाखत घेतली जाते.

६) संरचित व असंरचित मुलाखत- एखाद्या विषयावर पूर्वनियोजित मुलाखत म्हणजे संरचित मुलाखत व नोयोजित नसताना घेतलेली मुलाखत म्हणजे असंरचीत मुलाखती होत. ( उदा. Tv किंवा रेडियो च्या विशेष नियोजित अथवा अनियोजित कार्यक्रमासाठी घेतलेली मुलाखत )

# मुलाखतकाराणे व मुलाखत दात्याने मुलाखाती दरम्यान काय करावे काय करू नये.

- ❖ मुलाखतकार व मुलाखतदाता यांनी आपल्या देशाचे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक वैभव जपावे.
- ❖ प्रश्न आणि उत्तराचे स्वरूप प्रेक्षक किंवा श्रोत्यांना मार्गदर्शक व प्रेरणादायी असावे.
- ❖ सर्व सामान्यांना ( साक्षर, निरक्षर ) समजेल अशा शब्दांचा वापर प्रश्न आणि उत्तरात असावा.
- ❖ दोघांच्या आवाजात नम्रता , माधुर्य , सालसपण, सच्चेपण असावे. दोघांचा एकमेकांवर विश्वास असावा.
- ❖ मुलाखतघेणारा आणि मुलाखत देणाऱ्याची देहबोली, हावभाव, भावभावना सकारात्मक हव्यात.

# मुलाखतकाराने काय टाळावे

लगेच महत्वाच्या प्रश्नांना हात घालू नये.
खूप मोठे किंवा पाल्हाळीक प्रश्न नसावेत.
मुलाखत दात्यापेक्षा मुलाखतकाराने जास्त बोलू नये.
एका शब्दात उत्तरे येतील असे प्रश्न विचारू नयेत .
सामाजिक तेढ निर्माण होणार नाही याचे भान असावे.
प्रश्नांची पुनरावृत्ती नसावी. नकारात्मक भाव नसावेत.
मुलाखत दात्याच्या वैयक्तिक जीवनावर जास्त भाष्य नको.(जात,धर्म,भाषा,प्रांत,वैवाहिक जीवन हे विषय नकोत )
मुळ हेतू लक्षात घेऊन प्रश्न विचारावेत. ( विषयांतर नको )

# मुलाखत कशी घेतली जाते त्याचा आदर्श नमुना

https://www.youtube.com/watch?v=SdZEP8etEwg (नाना पाटेकर )

https://youtu.be/JKqwR374AXw प्रकाश आमटे )

https://www.youtube.com/watch?v=vUiIxDVwfgQ ( अण्णा हजारे )